## सप्टेंबर २०१७ अर्थसहाय्य प्राप्त उद्योजक

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | संध्या क्षिरसागर |
| व्यवसायाचा प्रकार | - | कापड उत्पादन |
| व्यवसायाचे नांव | - | एस.के. गारमेंट्स |
| कर्जाची रक्कम | - | १.०० लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | शुभम बागल |
| व्यवसायाचा प्रकार | - | वॉशिंग सेंटर |
| व्यवसायाचे नांव | - | अॅटो कार स्पा सेंटर |
| कर्जाची रक्कम | - | ४.८८ लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | भुषण कुलकर्णी |
| व्यवसायाचा प्रकार | - | छायाचित्रण |
| व्यवसायाचे नांव | - | क्षण फोटो स्टुडिओ |
| कर्जाची रक्कम | - | १.९५ लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | दिपक वाघमारे |
| व्यवसायाचा प्रकार | - | छायाचित्रण |
| व्यवसायाचे नांव | - | स्टुडीओ फोटो पॉईंट |
| कर्जाची रक्कम | - | १.८६ लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | पंकज मिसाळ |
| व्यवसायाचा प्रकार | - | छायाचित्रण |
| व्यवसायाचे नांव | - | स्टुडिओ १९४७ व मल्टी सर्व्हीसेस |
| कर्जाची रक्कम | - | १.०० लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | आशिष डांगोडे |
| व्यवसायाचा प्रकार | - | अॅटोरिक्षा |
| व्यवसायाचे नांव | - | आशिष डांगोडे |
| कर्जाची रक्कम | - | १.६३ लाख |
| बँक | - | स्टेट बँक ऑफ इंडिया |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | राकेश एरंडे |
| व्यवसायाचा प्रकार | - | इंजिनिअरींग वर्क्स |
| व्यवसायाचे नांव | - | एरंडे इंजिनिअरींग |
| कर्जाची रक्कम | - | १६.८० लाख |
| बँक | - | स्टेट बँक ऑफ इंडिया |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | सुवर्णा जाधव |
| व्यवसायाचा प्रकार | - | इंजिनिअरींग वर्क्स |
| व्यवसायाचे नांव | - | सुर्या इंजिनिअरींग |
| कर्जाची रक्कम | - | १२.०० लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

| | | |
|---|---|---|
| उद्योजकाचे नांव | - | विश्वास काळे |
| व्यवसायाचा प्रकार | - | औद्योगिक क्षेत्रातील कामे |
| व्यवसायाचे नांव | - | ओंकार इंडस्ट्रीज |
| कर्जाची रक्कम | - | ८.०० लाख |
| बँक | - | बँक ऑफ बडोदा |

सहाय्यक

Bajaj Auto Ltd.

**औरंगाबाद कार्यालय**
भारतीय युवा शक्ती ट्रस्ट
कार्यालय क्र.१०, दुसरा मजला, शितल कॅपिटल, चिश्तिया चौक,
टाऊन सेंटर, एन-५, सिडको, औरंगाबाद – ४३१ ००१
दुरभाष- +९१-२४०-६६०४८१-८४, भ्र. ९०७५४००३५१
ई-मेल- byst.aurangabad@cii.in
वेबसाईट- Web: www.bystonline.org

BUSINESS & YOUTH STARTING TOGETHER
BHARATIYA YUVA SHAKTI TRUST

**भारतीय युवा शक्ती ट्रस्ट**
आवृत्ती-६, सप्टें.२०१७
**वार्तापत्र**

आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या दुसरे तिमाही सत्र पुर्ण झाले. आणि आमच्या औरंगाबाद परिक्षेत्र कार्यालयाने आपली प्रथम श्रेणी कायम राखण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी लक्ष्य गाठण्यासाठी एकजुटीने कष्ट घेतले. टप्पाटप्याने सर्व कार्य संघ सदस्य आमचे परिक्षेत्र ध्येय साध्य करण्यासाठी तितकेच एकत्रितपणे कार्यरत आहे आणि हे केवळ कार्यकारण आणि कामाच्या समन्वयनामुळे होते.

हा प्रकल्प बजाज अॅटो द्वारा समर्पित आहे. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी औरंगाबाद शहरी कार्यालयाला बजाज अॅटोच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. बजाज अॅटोच्या अधिकाऱ्यांनी भारतीय युवा शक्ती ट्रस्ट अर्थसहाय्य प्राप्त उद्योजक श्री भरत निंबाळकर (हेअर सलुन आणि अकादमी) आणि श्री महेश स्वामी (प्लॉस्टीक मोल्डींग युनिट) या दोन्ही व्यवसायाला भेट देण्यात आली. या भेटी दरम्यान भारतीय युवा शक्ती ट्रस्टने त्यांचे मार्गदर्शक व अर्थसहाय्य प्राप्त उद्योजकांना आमंत्रित केले होते.

औरंगाबाद विभागातील बँक ऑफ महाराष्ट्राचे महाबँक भवन सिडको येथे २९ सप्टें.२०१७ रोजी औरंगाबाद अध्यादेशासाठी मासिक मार्गदर्शन अध्यापक सभा घेण्यात आली. नव्याने समाविष्ट असलेल्या भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या मार्गदर्शकाला मार्गदर्शकात अध्यापक अध्यक्षांनी मार्गदर्शन केले. अध्यापक (मेंटर) आणि उद्योजक यांची प्रथम भेट सुध्दा भारतीय युवा शक्ती ट्रस्टने येथे आयोजित केली होती.

आभार..!

भारतीय युवा शक्ती ट्रस्ट
औरंगाबाद संघ







## माहिती प्रसारण कार्यक्रम



### माहिती प्रसारण कार्यक्रम नागसेननगर येथे

भारतीय युवा शक्ती ट्रस्ट तर्फे माहिती प्रसारण कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम खास करुन महिलांच्या एका गटासाठी नागसेननगर येथे पार पडला. दि.०५/०९/२०१७ रोजी भारतीय युवा शक्ती ट्रस्टने हा कार्यक्रम घेतला, ज्या मध्ये बी.वाय.एस.टी.ने आधार दिलेल्या ४० पेक्षा जास्त उद्योजक हजर होते.



### माहिती प्रसारण कार्यक्रम व्यवसाय सुरु असणाऱ्या उद्योजकांसोबत

म.औ.वि.म. येथील पुर्वी उद्योग अस्तित्वात असणाऱ्या १५ उद्योजकांना बी.वाय.एस.टी. च्या कार्यालयात आमंत्रित केले गेले. बँक अधिकाऱ्यांकडून त्यांचे समुपदेशन करण्यात आले. आणि त्यांना व्यवसायाला लागणारी कागदपत्रांची यादी तयार करण्यासाठी सांगण्यात आले.



### माहिती प्रसारण कार्यक्रम मराठवाडा तांत्रिक प्रशिक्षण केंद्र

औरंगाबादमध्ये विख्यात असलेली तांत्रिक संस्था बी.वाय.एस.टी.ने माहिती प्रसारण कार्यक्रम दि.२८/०९/२०१७ रोजी प्रशिक्षित व कुशल विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता. हा कार्यक्रम दोन बॅचमध्ये विभागून घेण्यात आला. यामध्ये ॲटोमोबाईल उत्पादन व ए.सी. दुरुस्ती प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ६० पेक्षा जास्त विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते.

## उद्योजकांसाठी प्रशिक्षण शिबीर



### माहिती प्रसारण कार्यक्रम ब्रिजवाडी येथे

तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित असलेल्या महिलांच्या गटांसाठी ब्रिजवाडी येथे त्यांच्या केंद्रावर हा माहिती प्रसारणाचा कार्यक्रम भारतीय युवा शक्ती ट्रस्टकडून राबविण्यात आला. या कार्यक्रमाध्ये शिवणकामाचे प्रशिक्षण घेणाऱ्या महिला उपस्थित होत्या.



### माहिती प्रसारण कार्यक्रम उद्योगवर्धिनी उद्योजकता प्रशिक्षण केंद्र, चिकलठाणा

भारतीय युवा शक्ती ट्रस्टने उद्योगवर्धिनीच्या उद्योजकता प्रशिक्षण केंद्राच्या एका तुकडीसोबत दि.२४/०९/२०१७ रोजी माहिती प्रसारणाचा कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमामध्ये २० पेक्षा अधिक युवक सहभागी होते.जे तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित होते व त्यांना आपला स्वतःचाव्यवसाय सुरु करावयाचा आहे.



### उद्योजकता प्रशिक्षण शिबीर

या सर्व माहिती प्रसारणाच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्या लोकांचे समुपदेशन मार्गदर्शकांकडून व बँक अधिकाऱ्यांकडून करण्यात आले. त्यांना कार्यशाळेसाठी आमंत्रित करण्यात आले. ही कार्यशाळा दि.१९ व २० सप्टेंबर,२०१७ रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये ३४ उद्योजकांना प्रशिक्षित करण्यात आले. यामध्ये वक्ते म्हणून बँकेचे अधिकारी आणि सी.ए.यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांना या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

## क्षेत्र भेट



दि.१२/०९/२०१७ रोजी बजाजनगर, वाळूज येथे असलेल्या विशाल भातखेडे यांच्या विशाल जेन्ट्स पार्लरला भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. विशाल भातखेडे यांनी व्यवसायाचे पुढील नियोजन बी.वाय.एस.टी.च्या अधिकाऱ्यांना स्पष्ट केले व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुध्दा करण्यात आली.



दि.२०/०९/२०१७ रोजी भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी मुकूंदवाडी येथे अजय मोरे यांच्या युनिटला भेट दिली. ते एक संगणक केंद्र चालवत आहेत, याबाबत भागात त्यांच्या व्यवसायाला भरपूर मागणी आहे. त्यांनी त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी कर्ज मागणीकरीता कर्ज प्रस्ताव सादर केलेला आहे.



दि.२६/०९/२०१७ रोजी भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी जयभवानीनगर येथे पंकज मिसाळ यांच्या दुकानाला भेट दिली. वित्त विभाग अधिकाऱ्यांनी त्यांच्या व्यवसायाचे मुल्यमापन केले. त्यांनी नुकतीच आपल्या व्यवसायाला सुरुवात केलेली आहे. त्यांचा जागा सत्यापन व तांत्रिक मुल्यमापनाचा अर्ज भरुन घेतला आणि त्यांच्या राहत्या घराचे पत्याचे सत्यापन केले.

## मासिक संम्मेलन



०००००

दि.२३/०९/२०१७ रोजी भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या कार्यालयामध्ये मासिक आय.ई.एस.पी. बैठक घेण्यात आली. आय.ई.एस.पी. कमिटीने ११ उद्योजकांचा आढावा घेतला आणि ११ उद्योजकांचे विविध व्यवसायांचे प्रस्ताव मान्य करण्यात आले.



*प्रशिक्षण विभाग*

विभागीय प्रशिक्षणाधिकारी यांनी आय.सी.ई.ई. एम. महाविद्यालयाचे संचालक श्री.दिलीप गौर यांचा भारतीय युवा शक्ती ट्रस्टमध्ये मार्गदर्शन म्हणून समावेश करण्यात आला. त्यांचा शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये खुप मोठा अनुभव आहे.



००००

वाळूज एमआयडीसी येथे श्री योगेश पोफळे यांचा उद्योग आहे. या उद्योगाला भारतीय युवा शक्ती ट्रस्टचे औरंगाबाद शहराचे प्रमुख यांनी भेट दिली. योगेश पोफळे हे यशस्वीपणे आपला पुजाथाळी बनविण्याचा व्यवसाय चालवित आहे.

## औरंगाबाद (ग्रामीण)



### माहिती प्रसारण कार्यक्रम

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्ट औरंगाबाद ग्रामीण यांनी तुर्काबाद तालुका येथे दि.१८/०८/२०१७ रोजी माहिती प्रसारणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विविध व्यवसायामधील २० युवकांनी सहभाग नोंदविला.



### माहिती प्रसार कार्यक्रम

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्ट औरंगाबाद ग्रामीण यांनी जाणीव-जागृती या कार्यक्रमाचे आयोजन देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि.१२/०८/२०१७ रोजी केले होते. या कार्यक्रमाला ४५ पेक्षा अधिक युवक-युवतींनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला.



### *उद्योजकता प्रशिक्षण शिबीर*

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्ट औरंगाबाद ग्रामीण यांचा प्रथम उद्योजकता प्रशिक्षण शिबीर कार्यक्रम दि.१४ व १५ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ३८ संभाव्य उद्योजकांना प्रशिक्षित करण्यात आले आणि त्यांना या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

## औरंगाबाद (ग्रामीण)



### क्षेत्र भेट

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्ट औरंगाबाद ग्रामीण यांनी तुर्काबाद येथे श्री ज्ञानेश्वर भुजबळ यांच्या व्यवसायासाठी क्षेत्र पडताळणी भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आली.



### क्षेत्र भेट

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्ट औरंगाबाद ग्रामीण यांनी बाजारसावंगी येथे श्री सतिश तसकर यांच्या व्यवसायाला भारतीय युवा शक्ती ट्रस्ट च्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. त्यांनी हा व्यवसाय नुकताच सुरु केला आहे. त्यांचा जागा सत्यापन व तांत्रिक मुल्यमापनाचा अर्ज भरुन घेतला आणि त्यांच्या राहत्या घराचे पत्याचे सत्यापन केले.



### बँक भेट

बजाज ॲटो भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी दि.२०/०९/२०१७ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मोंढा नाका शाखेमध्ये भेट देऊन तेथील वित्त अधिकारी यांना बी.वाय.एस.टी.च्या संपूर्ण प्रक्रियेबाबत शाखा अधिकाऱ्यांना योग्य प्रकल्पाचे ऋण मंजुर करुन देण्यात यावे, अशा विनंतीद्वारे त्यांना सुचित केले.